**L. A. BILL No. XVII OF 2023.**

A BILL

TO CONSTITUTE GOSEVA AYOG FOR THE PRESERVATION, PROTECTION AND WELFARE OF CATTLE, AND FOR SUPERVISION OF INSTITUTIONS ENGAGED THEREIN, IN THE STATE OF MAHARASHTRA AND TO PROVIDE FOR THE MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७.**

**महाराष्ट्र राज्यामध्ये पशुंचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करण्यासाठी आणि त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण करण्यासाठी, गोसेवा आयोग घटित करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यामध्ये पशुंचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करण्यासाठी आणि त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण करण्यासाठी, गोसेवा आयोग घटित करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा

एचबी २९९९–१

तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## **प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र गोसेवा आयोग अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " पशु " याचा अर्थ, देशी जातीच्या गायी, वळू, बैल व वासरे, असा आहे आणि त्यात नोंद नसलेल्या जातीचा देखील अंतर्भाव होतो ;

(ख) " अध्यक्ष " याचा अर्थ, आयोगाचा अध्यक्ष, असा आहे ;

(ग) " गोसेवा आयोग " किंवा " आयोग " याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित केलेला महाराष्ट्र गोसेवा आयोग, असा आहे ;

(घ) " संस्था " याचा अर्थ, पशुंची निगा, प्रजनन, परिपालन व परिरक्षण करणारी आणि पशुंचे संवर्धन, संरक्षण व कल्याण या प्रयोजनार्थ, दुर्बल, वयस्क व रोगग्रस्त पशु स्वीकारणारी, त्यांचे संरक्षण करणारी , त्यांची काळजी घेणारी, त्यांचे व्यवस्थापन करणारी आणि त्यांच्यावर उपचार करणारी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमाअन्वये नोंदणी केलेली कोणतीही धर्मादाय संस्था, किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये अथवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी केलेली कोणतीही संस्था किंवा कंपनी अधिनियम, २०१३ अन्वये नोंदणी केलेली कोणतीही कंपनी, असा आहे अणि त्यात, गोसदन, गोशाळा, पांजरपोळ, गोरक्षण संस्था इत्यादी आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीअन्वये किंवा अन्यथा नोंदणी केलेला त्यांचा महासंघ किंवा संघ यांचा अंतर्भाव होतो ;

१९५० चा २९.
१८६० चा २१.
१९६१ चा महा. २४.
२०१३ चा १८.

(ङ) " सदस्य " याचा अर्थ, गोसेवा आयोगाचा सदस्य, असा आहे आणि त्यात अध्यक्षाचा अंतर्भाव होतो ;

(च) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(छ) " विनियम " याचा अर्थ, या अधिनियमान्वये गोसेवा आयोगाने केलेले विनियम, असा आहे ;

(ज) " नियम " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेले नियम, असा आहे ;

(झ) " राज्य शासन " किंवा " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे.

## प्रकरण दोन

## **गोसेवा आयोग**

गोसेवा आयोग घटित करणे व त्याचे विधिसंस्थापन.

**३.** (१) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाअन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी " महाराष्ट्र गोसेवा आयोग " म्हणून ओळखले जाणारे एक मंडळ घटित करील.

(२) गोसेवा आयोग हा, अखंड परंपरा व सामाईक मोहोर असणारा उपरोक्त नावाचा निगम निकाय असेल आणि त्यास जंगम व स्थावर अशा दोन्हीही प्रकारच्या मालमत्ता संपादित करण्याचा, ती धारण करण्याचा आणि तिचा विनियोग करण्याचा आणि करार करण्याचा अधिकार असेल आणि त्याच्या नावाने त्यास किंवा त्याच्या विरूद्ध दावा दाखल करता येईल.

(३) गोसेवा आयोगाचे मुख्यालय, विहित करण्यात येईल अशा ठिकाणी असेल.

(४) गोसेवा आयोगात पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

| | | |
|---|---|---|
| (क) | शासनाने खंड (त) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सदस्यांमधून नामनिर्देशित करावयाचा एक अशासकीय सदस्य | अध्यक्ष ; |
| (ख) | आयुक्त, पशु संवर्धन | पदसिद्ध सदस्य ; |
| (ग) | आयुक्त, कृषी | पदसिद्ध सदस्य ; |
| (घ) | आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास | पदसिद्ध सदस्य ; |
| (ङ) | आयुक्त, परिवहन | पदसिद्ध सदस्य ; |
| (च) | पोलीस उप-महानिरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला, पोलीस महासंचालकाने नामनिर्देशित करावयाचा एक अधिकारी | पदसिद्ध सदस्य ; |
| (छ) | सहसचिव किंवा उप-सचिव, पशुसंवर्धन | पदसिद्ध सदस्य ; |
| (ज) | धर्मादाय उपायुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला, धर्मादाय आयुक्ताने नामनिर्देशित करावयाचा एक अधिकारी | पदसिद्ध सदस्य ; |
| (झ) | उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला, ग्राम विकास विभागाने नामनिर्देशित करावयाचा एक अधिकारी | पदसिद्ध सदस्य ; |
| (ञ) | उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला, वित्त विभागाने नामनिर्देशित करावयाचा एक अधिकारी | पदसिद्ध सदस्य ; |
| (ट) | उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला, नगर विकास विभागाने नामनिर्देशित करावयाचा एक अधिकारी | पदसिद्ध सदस्य ; |
| (ठ) | उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला, गृह विभागाने नामनिर्देशित करावयाचा एक अधिकारी | पदसिद्ध सदस्य ; |
| (ड) | उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला, वन विभागाने नामनिर्देशित करावयाचा एक अधिकारी | पदसिद्ध सदस्य ; |
| (ढ) | संचालक (विस्तार), महाराष्ट्र पशु व मत्स्य व्यवसाय विज्ञान विद्यापीठ, नागपूर | पदसिद्ध सदस्य ; |
| (ण) | संचालक (विस्तार), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी किंवा वैरण विकासाच्या क्षेत्रामधील तज्ज्ञ असलेला, संचालक (विस्तार) यांनी नामनिर्देशित करावयाचा एक अधिकारी | पदसिद्ध सदस्य ; |
| (त) | शासनाच्या मते खालील क्षेत्रांतील अनुभव असलेल्या, राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाच्या नऊ अशासकीय व्यक्ती किंवा, अशासकीय संस्था (एन जी ओ) किंवा गोसदन, गोशाळा, पांजरपोळ व गोरक्षण संस्था, इत्यादी किंवा त्यांच्या महासंघाचे किंवा संघाचे प्रतिनिधी :— | सदस्य ; |

(एक) पशु कल्याण ;

(दोन) प्राणी व्यवस्थापन ;

(तीन) पशुवैद्यकीय विज्ञान ;

(चार) दुग्धव्यवसाय विकास किंवा दुग्धव्यवसाय तंत्रज्ञान;

(पाच) जैवतंत्रज्ञान व जैवविविधता ;

(सहा) पणन ;

(सात) कायदा ;

(आठ) सामाजिक कार्य ; किंवा

(नऊ) आधुनिक तंत्रज्ञान, संस्करण उद्योग आणि विविध आधुनिक तसेच देशी उपचारपद्धती अंतर्गत उपचार.

(य) सह आयुक्त, पशुसंवर्धन यांच्या पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला एक अधिकारी. सदस्य-सचिव.

(५) अशासकीय सदस्यांची नियुक्ती ही, त्यांची नावे **शासकीय राजपत्रात** ज्या दिनांकास प्रसिद्ध होतील त्या दिनांकापासून, अंमलात येईल.

(६) सह आयुक्त, पशुसंवर्धन हे पद निर्माण करण्यात येईल. तो, गोसेवा आयोगाचा सदस्य-सचिव म्हणून आपले कर्तव्य पार पाडील.

(७) अध्यक्षपद रिक्त असल्यास किंवा अध्यक्ष अनुपस्थित असल्यास, आयुक्त, पशुसंवर्धन हा अध्यक्षाची कार्ये पार पाडील.

अशासकीय सदस्यांचा पदावधी व भत्ते.

**४.** (१) शासनाच्या मर्जीस अधीन राहून, गोसेवा आयोगाचा अध्यक्ष आणि अशासकीय सदस्य, यांचा राज्य शासनाने पदावधी अगोदरच समाप्त केला नसल्यास, त्यांची नियुक्ती **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या मुदतीकरिता पद धारण करतील.

(२) अशासकीय सदस्यांना, विहित करण्यात येतील असे भत्ते मिळतील.

(३) अशासकीय सदस्यास, राज्य शासनाला उद्देशून आपल्या पदाचा लेखी राजीनामा देता येईल.

अनर्हता.

**५.** कोणतीही व्यक्ती जर,—

(क) भारताचा नागरिक नसेल ;

(ख) तिच्या वयाची एकवीस वर्षे पूर्ण झालेली नसतील ;

(ग) ती विकल मनाची असेल आणि सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केले असेल ;

(घ) नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असणाऱ्या अपराधाबद्दल तिला दोषी ठरविण्यात आले असेल ;

(ङ) तिला शासनाच्या सेवेतून काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल ; आणि

(च) ती अमुक्त नादार असेल,

तर ती, अध्यक्ष किंवा यथास्थिति, सदस्य म्हणून नियुक्त केली जाण्यास किंवा पदावर पुढे राहण्यास अनर्ह ठरेल.

अशासकीय सदस्यांना पदावरून काढून टाकणे.

**६.** (१) कोणताही अशासकीय सदस्य,—

(क) कलम ५ अन्वये तो अनर्ह ठरल्यास ;

(ख) त्याने कृती करण्याचे नाकारले किंवा कृती करण्यास तो असमर्थ ठरल्यास ;

(ग) गोसेवा आयोगाकडून अनुपस्थितीची परवानगी न घेता, गोसेवा आयोगाच्या लागोपाठच्या तीन बैठकींना अनुपस्थित राहिल्यास ; किंवा

(घ) त्याने अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून पदाचा दुरूपयोग केला आहे, त्यामुळे त्याने हे पद धारण करणे चालू ठेवल्यास, गोसेवा आयोगाच्या हितसंबंधाना बाध निर्माण होईल, असे राज्य शासनाचे मत झाल्यास,

राज्य शासनास त्याला काढून टाकता येईल.

(२) अशासकीय सदस्याला, त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, पोट-कलम (१) अन्वये त्याला पदा वरून काढून टाकण्याचे आदेश काढता येणार नाहीत ; आणि जेव्हा असा आदेश काढला असेल तेव्हा अशा रीतीने पदावरून काढून टाकलेल्या सदस्याचे पद रिक्त झाल्याचे मानण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये अशा रीतीने पदावरून काढून टाकण्यात आलेली व्यक्ती, गोसेवा आयोगाचा सदस्य म्हणून किंवा गोसेवा आयोगाच्या इतर कोणत्याही पदावर पुनर्नियुक्तीसाठी पात्र असणार नाही.

नैमित्तिक रिक्त पद.

**७.** (१) अशासकीय सदस्याचा मृत्यू, राजीनामा, अनर्हता किंवा त्यास पदावरून काढून टाकल्यामुळे कोणतेही नैमित्तिक पद रिक्त झाल्यास, शक्य तितक्या लवकर ते भरण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेला सदस्य हा, ज्या सदस्याच्या जागेवर त्याची नियुक्ती झाली आहे त्या सदस्याने जर पद रिक्त झाले नसते तर जेवढ्या कालावधीसाठी ते पद धारण केले असते तेवढ्या कालावधीसाठी ते पद धारण करील.

गोसेवा आयोगाच्या बैठकी.

**८.** (१) गोसेवा आयोग एका वर्षात किमान चार बैठका घेईल आणि आपल्या कार्यवृत्त नोंदवहीत त्याच्या कामकाजाचा अभिलेख ठेवील.

(२) अध्यक्षाद्वारे, गोसेवा आयोगाची बैठक बोलाविण्यात येईल आणि अध्यक्ष त्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल.

(३) गोसेवा आयोग, या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींना अधीन राहून, विनियमांद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या त्याच्या बैठकींमधील (तेथील गणपूर्तीसह) कामकाज चालविण्याच्या संबंधातील अशा कार्यपद्धतीचे पालन करील.

रिक्त पदांमुळे कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे.

**९.** गोसेवा आयोगाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही, त्यात कोणतेही पद रिक्त आहे किंवा गोसेवा आयोगाच्या रचनेमध्ये कोणताही दोष आहे, केवळ एवढ्याच कारणावरून विधिअग्राह्य ठरणार नाही.

अधिकाऱ्यांची व इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती.

**१०.** राज्य शासनास, याबाबतीत करण्यात येतील अशा नियमांना अधीन राहून, या अधिनियमान्वये गोसेवा आयोगाला त्याची कार्ये कार्यक्षमतेने पार पाडणे शक्य व्हावे या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक वाटतील इतके अधिकारी व इतर कर्मचारी पुरविता येतील.

गोसेवा आयोगाची कार्ये.

**११.** गोसेवा आयोग, पुढील कार्ये पार पाडील :—

(क) या अधिनियमान्वये संस्थांची नोंदणी करणे ;

(ख) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये पशुंच्या संरक्षणाची सुनिश्चिती करणे ;

(ग) गोसदन, गोशाळा, पांजरपोळ व गोरक्षण संस्था यांच्या विकासासंबंधीचे राज्य शासनाचे कार्यक्रम व योजना यांची योग्य आणि वेळेवर अंमलबजावणी होईल याची सुनिश्चिती करणे ;

(घ) विशेषतः महाराष्ट्र राज्यातील देशी जातीच्या पशुंच्या विकासामध्ये संस्थांच्या सक्रिय सहभागाची सुनिश्चिती करणे ;

(ङ) पशु आरोग्य सेवांचे प्रचालन करणे ;

(च) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीच्या उल्लंघनाकरिता जप्त केलेल्या पशुंची काळजी व व्यवस्थापनाची सुनिश्चिती करणे ;

(छ) संस्थेद्वारे देखभाल करण्यात येणाऱ्या दुर्बल, वयस्क व रोगग्रस्त पशुंचे योग्य व्यवस्थापन, काळजी व उपचार यांची सुनिश्चिती करणे ;

(ज) पशु व्यवस्थापनासंबंधी शेतकरी व इतर हितसंबंधित व्यक्ती यांच्याकरिता जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रम यांच्या अंमलबजावणीची सुनिश्चिती करणे ;

(झ) देशी जातींच्या पशुंचे संवर्धन व विकास यामध्ये संस्थांच्या सक्रिय सहभागाच्या अंमलबजावणीची सुनिश्चिती करणे ;

(ञ) महाराष्ट्र राज्याच्या गोवंश प्रजनन धोरणाच्या अंमलबजावणीची सुनिश्चिती करणे व त्याचे संनियंत्रण करणे ;

(ट) संस्थांचे पर्यवेक्षण व निरीक्षण करणे ;

(ठ) वैरण आणि वैरणीची बियाणे यांच्या सुधारित प्रकारांच्या लागवडीचे व उत्पादनाचे आणि कुरण विकास कार्यांचे प्रचालन करणे ;

(ड) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर आणि पशु आणि वैरण विकास कार्यक्रमांशी संबंधित इतर संशोधन संस्था यांच्यामध्ये समन्वय साधणे आणि नवीन वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा अंगीकार करण्यासाठी संस्थांच्या सक्रिय सहभागाची सुनिश्चिती करणे ;

(ढ) जाती सुधारणा, वैरण विकास आणि मल, मूत्र व बायोगॅस, इत्यादींवर आधारित उद्योग आणि यांसाठी विद्यापीठे आणि इतर संशोधन संस्था, यांच्याशी समन्वय साधणे आणि नवीन वैज्ञानिक तंत्रज्ञान स्वीकारण्याच्या कामी त्यांचे सहाय्य घेणे ;

(ण) आर्थिकदृष्ट्या कमकुवत संस्थांना बळकट करण्यासाठी सहाय्यकारी ठरतील अशा उपाययोजना सुचविणे ;

(त) संस्थांना आर्थिक सहाय्य देणे ;

(थ) कोणत्याही संस्थांच्या कामकाजातील तक्रारींची चौकशी करणे ;

(द) पशुंवरील क्रुरतेला प्रतिबंध करण्याच्या कृतींचा आढावा घेणे ;

(ध) जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक सोसायटीच्या कामाचा आढावा घेणे ;

(न) या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींच्या अंमलबजावणीची सुनिश्चिती करणे ; आणि

(प) विहित करण्यात येतील अशी इतर कार्ये पार पाडणे.

## प्रकरण तीन

## **संस्थांची नोंदणी**

संस्थांची नोंदणी आणि त्यांच्या लेख्यांचे लेखापरीक्षण.

**१२.** (१) प्रत्येक संस्था, या अधिनियमान्वये नोंदणीसाठी गोसेवा आयोगाकडे, विहित करण्यात येईल, अशा नमुन्यात व रीतीने आणि असा तपशील अंतर्भूत करून, अशा संस्थेने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने यथोचितरीत्या स्वाक्षरी केलेला, अर्ज,—

(क) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या संस्थांच्या बाबतीत, अशा दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत ; आणि

(ख) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर ज्या दिनांकास, संस्था स्थापन झाली असेल त्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीत,

सादर करील.

(२) अर्जासोबत विहित करण्यात येईल अशी फी भरावी लागेल.

(३) गोसेवा आयोग, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात नोंदणी प्रमाणपत्र देईल.

(४) गोसेवा आयोग, त्याच्याकडे नोंदणी करण्यात आलेल्या संस्थांची विहित करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये नोंदवही ठेवील.

(५) पोट-कलम (४) अन्वये विहित केल्याप्रमाणे नोंदवहीमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही संस्थेच्या संबंधातील कोणत्याही तपशिलामध्ये जर कोणताही बदल असल्यास ज्या व्यक्तीकडे त्या संस्थेच्या वतीने काम सोपविले आहे ती व्यक्ती, गोसेवा आयोगाला अशा बदलाविषयी कळवील. गोसेवा आयोग त्याला योग्य वाटेल अशी (कोणतीही असल्यास) चौकशी करुन, नोंदवहीमध्ये आवश्यक ते बदल करील.

(६) या अधिनियमान्वये जिची नोंदणी करण्यात आली आहे अशा प्रत्येक संस्थेच्या लेख्यांचा प्रत्येक वर्षाच्या एकतीस मार्च रोजी विहित केलेल्या रीतीने ताळेबंद करण्यात येईल आणि दरवर्षी त्यांची लेखापरीक्षा करण्यात येईल.

*तपासणी.*

**१३.** गोसेवा आयोगास किंवा याबाबत त्याने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्यास, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या अंमलबजावणीची सुनिश्चिती करण्याच्या प्रयोजनार्थ, संस्थेच्या कोणत्याही जागेची किंवा त्याच्या कोणत्याही अभिलेखांची तपासणी करता येईल.

## प्रकरण चार

## वित्त, लेखे व लेखापरीक्षा

*गोसेवा आयोग निधी.*

**१४.** (१) " गोसेवा आयोग निधी " म्हणून संबोधला जाणारा गोसेवा आयोगाचा एक निधी असेल, यामध्ये शासनाने दिलेली अनुदाने, प्राप्त झालेली फी, आणि कोणत्याही व्यक्तीने किंवा संस्थेने त्याला दिलेल्या देणग्या, बक्षिसे व मृत्युपत्रित दान यांसह आयोगाला प्राप्त झालेला सर्व पैसा, जमा करण्यात येईल.

(२) गोसेवा आयोगाचा सर्व निधी राष्ट्रीयीकृत बँकेत ठेवला जाईल आणि आयोगाने त्याच्या वतीने, लेखी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीद्वारे त्याचे कार्यान्वयन करण्यात येईल.

*लेखे व लेखापरीक्षा.*

**१५.** (१) गोसेवा आयोग, योग्य लेखे आणि इतर संबंधित अभिलेख ठेवील आणि महालेखापाल, महाराष्ट्र यांच्याशी विचारविनिमय करून विहित करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये वार्षिक लेखा विवरणपत्र तयार करील.

(२) गोसेवा आयोगाच्या लेख्यांची महालेखापालाकडून, महालेखापाल विनिर्दिष्ट करील अशा कालांतराने, लेखापरीक्षा करण्यात येईल आणि अशा लेखापरीक्षेसंबंधीचा कोणताही खर्च आयोगाकडून करण्यात येईल.

(३) महालेखापालाला किंवा या अधिनियमान्वये, गोसेवा आयोगाच्या लेख्यांच्या लेखापरीक्षेसंबंधी त्यांच्याकडून नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला, शासकीय लेख्यांच्या लेखापरीक्षेसंबंधी महालेखापालाला सर्वसाधारणपणे जे अधिकार, विशेषाधिकार आणि प्राधिकार असतात, तेच अधिकार, विशेषाधिकार आणि प्राधिकार असतील, आणि विशेषतः नोंदवह्या, लेखे, संबंधित प्रमाणके आणि इतर दस्तऐवज व कागदपत्रे मागविण्याचा अधिकार असेल आणि गोसेवा आयोगाच्या कोणत्याही कार्यालयाची तपासणी करण्याचा अधिकार असेल.

*वार्षिक अहवाल.*

**१६.** गोसेवा आयोग, प्रत्येक वित्तीय वर्षाला विहित करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये आणि अशा दिनांकापर्यंत मागील वित्तीय वर्षातील आपल्या कार्याची संपूर्ण माहिती देणारा वार्षिक अहवाल तयार करील ; आणि विहित दिनांकापासून एका महिन्याच्या आत शासनाला त्याची प्रत सादर करील.

*आयोगाच्या अहवालावर कार्यवाही.*

**१७.** (१) कलम १६ अन्वये सादर करण्यात आलेला वार्षिक अहवाल मिळाल्यानंतर, शासन त्यावर त्याला आवश्यक वाटेल अशी कार्यवाही करील.

(२) शासनाला, सादर केलेल्या अहवालाची प्रत, पोट-कलम (१) अन्वये शासनाकडून त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या अहवालासह राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

## प्रकरण पाच

## संकीर्ण

*अहवाल, विवरणे, इत्यादी मागविण्याचा शासनाचा अधिकार.*

**१८.** राज्य शासनास, गोसेवा आयोगाकडून वेळोवेळी, त्याला आवश्यक वाटतील, असे अहवाल, विवरणे, किंवा, विवरणपत्रे मागविता येतील.

अभिलेख मागविण्याचा आयोगाचा अधिकार.

**१९.** गोसेवा आयोगास, या अधिनियमाखालील कामे पार पाडणे आयोगाला शक्य व्हावे म्हणून, राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाकडून किंवा कोणत्याही निकायाकडून किंवा प्राधिकरणाकडून किंवा कोणत्याही संस्थेकडून माहिती किंवा अहवाल मागविता येईल आणि विभाग किंवा निकाय किंवा प्राधिकरण किंवा, यथास्थिति, संस्था व्यवहार्य असेल तितक्या लवकर, गोसेवा आयोगाच्या विनंतीचे पालन करतील.

निदेश देण्याचे अधिकार.

**२०.** राज्य शासनास, वेळोवेळी, लोकहितासाठी व गोसेवा आयोगाच्या अधिक चांगल्या आणि प्रभावी प्रशासनाकरिता आवश्यक वाटतील असे निदेश आयोगास देता येतील ; आणि गोसेवा आयोग अशा निदेशांचे पालन करील.

अपील.

**२१.** (१) कलम २२ अन्वये गोसेवा आयोगाने पारित केलेल्या आदेशाने किंवा या अधिनियमान्वये पारित केलेल्या कोणत्याही अन्य आदेशाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, तिला सदर आदेश कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, शासनाकडे अपील दाखल करता येईल.

(२) असे अपील प्राप्त झाल्यानंतर राज्य शासन, अपिलकर्त्याला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर त्यास योग्य वाटेल असा आदेश पारीत करील.

(३) या कलमान्वये शासनाने दिलेला प्रत्येक आदेश, अंतिम असेल.

शास्ती.

**२२.** (१) एखाद्या व्यक्तीने किंवा संस्थेने या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लघंन केल्यास किंवा अशा तरतुदींनुसार काढलेल्या कोणत्याही आदेशाचे पालन करण्यात कसूर केल्यास, गोसेवा आयोगास, त्याला आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, आणि त्या व्यक्तीला किंवा संस्थेला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, तिच्यावर दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शास्ती लादता येईल.

(२) जर शास्तीची रक्कम भरण्यात आली नसेल तर ती, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल.

गोसेवा आयोगाचे सदस्य हे लोकसेवक असणे.

**२३.** गोसेवा आयोगाचे सर्व सदस्य आणि अधिकारी या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदीनुसार काम करीत असताना किंवा काम करीत असल्याचे अभिप्रेत असताना भारतीय दंड संहितेच्या, कलम २१ च्या अर्थांतर्गत, लोकसेवक असतील असे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

**२४.** या अधिनियमान्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल गोसेवा आयोगाच्या कोणत्याही सदस्यावर, अधिकाऱ्यावर किंवा कर्मचाऱ्यावर कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

विनियम करण्याचा अधिकार.

**२५.** गोसेवा आयोगास, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, विनियमांद्वारे या अधिनियमाखाली तरतूद करावयाच्या सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे विनियम वेळोवेळी करता येतील.

नियम करण्याचा अधिकार.

**२६.** (१) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या

लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहे सहमत होतील आणि असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशी अधिसूचना **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून, तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, तो अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन केल्यामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**२७.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, शासनास, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, प्रसंगानुरुप, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या प्रयोजनांशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

पशुंचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करण्याच्या आणि विशेषतः महाराष्ट्र राज्यातील देशी जातीच्या पशुंचा विकास करण्याच्या मुद्द्याकडे राज्य शासनाचे लक्ष वेळोवेळी वेधण्यात आले आहे.

२. पशु प्रजननाचे आणि स्थानिक जातींचे संवर्धन, अनुवंशिक सुधारणा, वैरण विकास यामध्ये कार्यरत असलेल्या गोसदन, गोशाळा, पांजरपोळ, गोरक्षण संस्था, इत्यादी संस्थांना उत्तेजन देणे आणि तसेच पशुंची उत्पाकदता वाढविण्यामध्ये अशा संस्थांच्या प्रत्यक्ष सहकार्याची सुनिश्चिती करणे आवश्यक आहे असे शासनास वाटते. उपरोक्त प्रयोजनांसाठी, पशुंचे संवर्धन, संरक्षण व कल्याण आणि त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण करण्यासाठी व राज्यात 'महाराष्ट्र गोसेवा आयोग' घटित करण्यासाठी तरतूद करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता एक नवीन कायदा अधिनियमित करणे शासनास इष्ट वाटते.

३. विधेयकाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :—

(क) पशुंचे संवर्धन, संरक्षण व कल्याण यासाठी आणि राज्यामध्ये अशा कार्यरत संस्थांच्या पर्यवेक्षणासाठी 'महाराष्ट्र गोसेवा आयोग' घटित करणे ;

(ख) राज्यामध्ये पशुंचे संवर्धन, संरक्षण व कल्याण यासाठी कार्यरत संस्थांची नोंदणी करणे ;

(ग) नोंद नसलेल्या पशुंसह देशी जातीच्या पशु प्रजननास चालना देणे ;

(घ) पशुंच्या आरोग्य सुविधांचे प्रचालन करणे ;

(ङ) राज्यातील गोसदन, गोशाळा, पांजरपोळ, गोरक्षण संस्था, इत्यादींच्या कामकाजाचे पर्यवेक्षण करणे ;

(च) वैरण, वैरणीची बियाणे यांच्या सुधारित प्रकारांच्या लागवडीचे व उत्पादनाचे आणि कुरण विकास कार्याचे प्रचालन करणे ;

(छ) पशु व्यवस्थापनाच्या बाबतीत शेतकरी आणि इतर हितसंबंधित व्यक्तीमध्ये जागरुकता निर्माण करणे व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे ;

(ज) जाती सुधारणा, वैरण विकास, इत्यादींसाठी नवीन वैज्ञानिक तंत्रज्ञाने विकसित करण्यासाठी आणि ती स्वीकृत करण्यासाठी विद्यापीठे व इतर संशोधन संस्थांचा पाठिंबा मिळविण्याकरिता विद्यापीठे व इतर संशोधन संस्थांशी समन्वय साधणे.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २१ मार्च, २०२३.

**राधाकृष्ण विखे-पाटील,**
पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड १ (२).—** या खंडान्वये, हा अधिनियम ज्या दिनांकास अंमलात येईल तो दिनांक **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ३.—** या खंडातील,–

(क) उप-खंड (१) अन्वये, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, प्रस्तावित कायद्यान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी " महाराष्ट्र गोसेवा आयोग " या नावाने ओळखले जाणारे एक आयोग घटित करण्याचा अधिकार ;

(ख) उप-खंड (३) अन्वये, गोसेवा आयोगाचे मुख्यालय, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार ;

(ग) उप-खंड (५) अन्वये, अशासकीय सदस्यांची नावे, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्याचा अधिकार,

राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ४ (२).—** या खंडान्वये, गोसेवा आयोगाच्या अशासकीय सदस्यांना मिळणारे भत्ते, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १०.—** या खंडान्वये, आवश्यक वाटतील असे गोसेवा आयोगाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांची संख्या नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ११ (प).—** या खंडान्वये, गोसेवा आयोगाची अशी अन्य कामे नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १२.—** या खंडातील,—

(क) उप-खंड (१) अन्वये, या अधिनियमान्वये संस्थेने नोंदणी करण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना, रीत व त्यातील तपशील नियमांद्वारे विहित करण्याचा ;

(ख) उप-खंड (२) अन्वये, अर्जासोबत जोडावयाचे शुल्क नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार ;

(ग) उप-खंड (३) अन्वये, नोंदणी प्रमाणपत्र ज्या नमुन्यात द्यावयाचे आहे, तो नमुना नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार ;

(घ) उप-खंड (४) अन्वये, संस्थेची नोंदवही ज्या नमुन्यात ठेवावयाची आहे तो नमुना नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार ;

(ङ) उप-खंड (६) अन्वये, नोंदणीकृत संस्थेच्या वार्षिक लेख्यांची लेखापरीक्षा करण्याची रीत नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार,

राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १५.—** या खंडान्वये, गोसेवा आयोग संबंधित अभिलेख आणि लेख्यांवरील अहवाल महाराष्ट्र राज्याच्या महालेखापलाशी विचारविनिमय करून ज्या नमुन्यात तयार करील तो नमुना, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १६.—** या खंडान्वये, गोसेवा आयोग, ज्या नमुन्यात मागील वित्तीय वर्षाच्या आपल्या कार्याची संपूर्ण माहिती देणारा वार्षिक अहवाल तयार करील आणि त्याची प्रत राज्य शासनास सादर करील तो नमुना, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

(शा.म.मु.) एचबी २९९९–३ (४४०–३-२०२३)

**खंड २५.—** या खंडान्वये, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेव्दारे विनियम करण्याचा अधिकार, गोसेवा आयोगाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २६.—** या खंडान्वये, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेव्दारे नियम करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २७.—** या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास ती दूर करण्यासाठी, **शासकीय राजपत्रात** आदेश काढून ती दूर करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**२.** वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव सामान्य स्वरूपाचे आहेत.

**वित्तीय ज्ञापन**

या विधेयकाच्या खंड ३ मध्ये गोसेवा आयोगाची रचना व विधिसंस्थापन यासाठी तरतूद आहे. या विधेयकाच्या खंड ४ मध्ये गोसेवा आयोगाच्या अशासकीय सदस्यांना देय असलेल्या भत्त्यांकरिता तरतूद आहे. या विधेयकाच्या खंड १० मध्ये गोसेवा आयोगाच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी तरतूद आहे.

हे विधेयक राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यानंतर त्यामध्ये, वेतन, भत्ते, इत्यादींसह गोसेवा आयोगाच्या प्रशासकीय खर्चासाठी, राज्याच्या एकत्रित निधीतून आवर्ती व अनावर्ती खर्चाचा अंतर्भाव होईल. यात अंदाजे रुपये दहा कोटी इतका अनावर्ती खर्च अंतर्भूत असेल परंतु याबाबतीत खर्च करण्यात येणाऱ्या प्रत्यक्ष आवर्ती खर्चाचा अंदाज या टप्प्यावर करणे शक्य नाही.

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (३) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र गोसेवा आयोग विधेयक, २०२३ विचारात घेण्याबाबत राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना शिफारस करील आहेत.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७.]**

**[ महाराष्ट्र राज्यामध्ये पशुंचे संवर्धन, संरक्षण व कल्याण करण्यासाठी आणि त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण करण्यासाठी, गोसेवा आयोग घटित करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक. ]**

**[श्री. राधाकृष्ण विखे-पाटील,**
पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
विकास मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई